ACB सोलापूर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** मंगळवेढा **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0355 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/06/2021 12:04 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
 **Time Period (कालावधी):** पहर 4
 **Date From (दिनांक पासून):** 13/05/2021
 **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/05/2021
 **Time From (वेळेपासून):** 12:20 बजे
 **Time To (वेळेपर्यंत):** 12:51 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/06/2021 **Time (वेळ):** 11:52 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 011 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/06/2021 11:52 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मंगळवेढा पोलीस स्टेशनचे, इमारतीचे पाठिमागील बाजुस मंगळव,मंगळवेढा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बाळासाहेब ऊर्फ भिमराव कष्णा चौगुले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

फिर्यादीपर प्रत मिळाली
भि. कृ. चौगुले
दि. 1.6.2021

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | बोराळे तामंगळवेढा,मंगळवेढा,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | बोराळे तामंगळवेढा,मंगळवेढा,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोलीस चव्हाण | | | 1. मंगळवेढा पोलीस ठाणे ,मंगळवेढा, सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | सि.डी. प्लेअर | दोन मेमरी कार्ड | 1,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)): 1,000.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

खबरी जबाब दिनांक 01/06/2021मी, बाळासाहेब ऊर्फ भिमराव कृष्णा चौगुले वय 29 वर्षे व्यवसाय-ट्रक्टर ड्रायव्हर, शिक्षण 8 वी पास रा.मु.पो.बोराळे ता.मंगळवेढा जि.सोलापूर मोबाईल नंबर 8421510478 समक्ष मंगळवेढा पोलीस ठाणे येथे हजर होवुन खबरी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी राहणेस असून माझे मावस भावाचे ट्रक्टरवर ड्रायव्हर म्हणून काम करतो. मला मराठी भाषा लिहीता वाचता येते.मी, सन 2018 मध्ये शेती कामासाठी ट्रली खरेदी केली होती. सदर ट्रलीतून मी शेतीसाठी खत, मुरुम व शेती मालाची वाहतूक करीत असतो. दिनांक 10/05/2021 रोजी मी माझ्या ट्रयलीतून तांडूर ते बोराळे अशी वाळूची वाहतूक करीत होतो. त्यावेळी तांडूर गावामध्ये सदर ट्रलीचे मागील चाकाची बेरींग गेली, त्यामुळे मी दुसरी ट्रली घेवून येवून सदर ट्रलीतील वाळू काढून ती मोकळी केली. त्यानंतर मी माझी ट्रली आणण्यासाठी तांडूर येथे गेलो असता माझी ट्रली पोलीसांनी मंगळवेढा पोलीस ठाण्यात घेवून गेले असल्याचे मला समजले. त्यामुळे मी मंगळवेढा पोलीस ठाण्यात जावून माझ्या ट्रलीबाबात चौकशी केली असता तेथील पोलीस चव्हाण यांनी मला, तू वाळूची अवैध वाहतूक करतोयस तुझ्यावर वाळू चोरीचा गुन्हा दाखल करणार आहे असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना, मी चोरीची वाळू वाहतूक करीत नाही शेती मलाची वाहतूक करतो असे म्हणालो. त्यावेळी चव्हाण पोलीस यांनी मला साहेब तुझी ट्रली सोडतील पण साहेबाला तीस हजार रुपये दयावे लागतील आणि वाळू वाहतूक करणार असशील तर त्याचा हप्ता चालू करावा लागेल असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणून मी घरी निघून गेलो.त्यानंतर मंगळवेढा पोलीस ठाणेचे पोलीस चव्हाण यांनी माझ्या पकडलेल्या ट्रलीवरी कारवाई न करता सोडण्यासाठी व वाळू वाहतूकीचा हप्ता साहेबांना देण्यासाठी 30,000/- रुपयेची लाच मागणी केली म्हणून मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयास संपर्क साधून माझी तक्रार असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री.नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक यांनी मला सातारा एसीबी युनिटचे श्री.शिर्के साहेब कारवाईसाठी येणार असल्याचे कळविले.त्यानंतर श्री. अशोक शिर्के, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा यांनी माझ्याशी संपर्क साधुन कारवाईबाबत माहिती घेतली व मलाही माहिती दिली. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी मला दिनांक 13/05/2021 रोजी मंगळवेढा गावचे अलिकडे एमआयडीसी रोडला रस्त्याचे कडेला येवुन थांबण्याची सुचना दिली. त्यानंतर दिनांक 13/05/2021 रोजी श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी मंगळवेढा गावचे अलिकडे एमआयडीसी रोडला आल्यानंतर माझ्याशी संपर्क साधुन मला वाहनाचे वर्णन सांगुन थांबले ठिकाणी येण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी माझ्या दुचाकी वाहनाने त्या ठिकाणी गेलो. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, त्यांचे सापळा पथकासह खाजगी वाहनाने सापळा कारवाईकामी लागणारे सर्व साहीत्यासह हजर होते. त्याठिकाणी श्री. शिर्के साहेबांनी, माझी व मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा या कार्यालयातील 1) नंदकुमार पोपट महानवर, सहा.लेखा व 2) भिमराव रंगराव इंगळे, सहा. लेखा या दोन शासकिय पंचांसह, सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझी तक्रार दोन्ही पंचास सांगुन माझा लेखी तक्रारी अर्ज व ट्रली

खरेदी केलेल्याची पावतीची झेरक्स श्री. शिर्के साहेबांकडे दिला. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे मंगळवेढा पोलीस स्टेशन येथील पोलीस चव्हाण यांनी माझ्याकडे लाच मागणी केली अगर कसे? याची पडताळणी करण्यासाठी पंच नं. 1 म्हणुन श्री.महानवर व पंच नं. 2 म्हणुन श्री. इंगळे यांनी काम करण्याचे शिर्के साहेबांनी ठरवुन माझा तक्रारी अर्ज त्यांनी व दोन्ही पंचांनी वाचन करुन त्यावर सहया केल्या. त्यानंतर मला व पंच नं. 1 यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह मंगळवेढा पोलीस स्टेशन येथे पोलीस चव्हाण यांची भेट घेण्यासाठी माझ्या दुचाकीवारुन पाठवुन पडताळणी केली असता त्यामध्ये माझी व मंगळवेढा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गुंजवटे साहेब यांची समक्ष भेट झाली नसल्याने आमचेमध्ये कोणत्याही प्रकारचे लाच मागणीचे संभाषण झालेले नाही. तसचे माझी व पोलीस चव्हाण साहेब यांची समक्ष भेट झाली. त्यावेळी पोलीस चव्हाण यांनी माझ्याकडे माझ्या पकडलेल्या ट्रलीवर कारवाई न करता सोडण्यासाठी व वाळु वाहतुकीचा हप्ता साहेबांना देण्यासाठी म्हणुन 30,000/- रुपयांची लाच मागणी करुन साडेपाच वाजता फोन करुन ती लाच रक्कम आणुन देण्यास सांगितल्याची श्री. शिर्के साहेब व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर श्री.शिर्के साहेब यंनी मला 30,000/- रुपये लाच रक्कम हजर करण्यास सांगितली असता मी, शिर्के साहेब यांना, सध्या माझ्याकडे 20,000/- रुपये एवढीच रक्कम उपलब्ध झाली असल्याचे सांगुन 20,000/- रुपये लाच रक्कम श्री. शिर्के साहेब यांचेकडे हजर केली. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर आयोजित केले सापळा कारवाईमध्ये पोलीस चव्हाण यांनी मला, मंगळवेढा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गुंजवटे साहेब यांची भेट घेवु दिली नाही. तसेच माझी व पोलीस चव्हाण यांची समक्ष भेट झाली, त्यावेळी आमचेमध्ये कामाबाबत चर्चा झाली. त्यामध्ये पोलीस चव्हाण यांनी माझ्याकडे माझे पकडलेल्या ट्रलीवर कारवाई न करता सोडण्यासाठी व वाळु वाहतुकीचा हप्ता साहेबांना देण्यासाठी साहेबांचे नाव सांगुन 30,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली होती. ती पुर्ण लाच रक्कम मी, न आणल्याने पोलीस चव्हाण यांनी माझ्याकडे जुळणी झालेली 20,000/- रुपये लाच रक्कम न स्विकारता मला, साहेब नाय म्हणतय राव, साहेब थांब म्हणतय थोडे दिवस तु जा आता, बर का बोलतो साहेबांना जा तु जा असे म्हणुन साहेब सांगतील त्यावेळीस मागणी केलेली संपुर्ण 30,000/- रुपये लाच रक्कम आणुन देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने श्री.शिर्के साहेब यांनी सापळा कारवाई मागे घेतली. त्यानंतर श्री. शिर्के साहेब यांनी मला गोपनियतेच्या सुचना दिल्या व श्री.शिर्के साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे साताराला निघुन गेले. त्यानंतर दिनांक 17/05/2021 रोजी मला, पोलीस चव्हाण यांनी फोन करुन माझ्यावर गुन्हा दाखल झाला असलेबाबत कळविले, त्यावेळी मी, त्यांना दिनांक 19/05/2021 रोजी भेटण्यासाठी येणार असलेबाबत कळविले. त्यानंतर मी, दिनांक 18/05/2021 रोजी श्री. शिर्के साहेब यांना पोलीस चव्हाण यांचा आलेल्या फोनबाबत माहती फोन करुन सांगितली. त्यावेळी श्री.शिर्के साहेब यांनी मला, दि.19/05/2021 रोजी 11.00 वाजता लाच रकमेसह मंगळवेढा एमआयडीसी बायपासला रस्त्याचे कडेला येवुन थांबण्याच्या सुचना दिल्या. दिनांक 19/05/2021 रोजी श्री. शिर्के साहेब, यांनी माझाशी संपर्क साधुन वाहनाचे वर्णन सांगुन मंगळवेढा एमआयडीसी बायपासला रस्त्याचे कडेला थांबले ठिकाणी बोलावुन घेतले. काही वेळातच मी, त्या ठिकाणी माझ्याकडील दुचाकी वाहनाने पोहोचलो. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनाने कारवाईकामी लागणाऱ्या साहीत्यासह हजर होते. त्यावेळी शिर्के साहेबांनी मला त्यांचेकडील वाहनामध्ये घेतले. त्यानंतर श्री.शिर्के साहेब यांनी माझा जबाब नोंदविला.त्यानंतर श्री.शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 30,000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर शिर्के साहेब यांनी माझ्याकडे व्हईस रेकर्डर देवुन मी व पंच नं. 1 महानवर असे आम्ही दोघे पोलीस चव्हाण यांची भेट घेण्यासाठी मंगळवेढा पोलीस स्टेशन येथे गेलो असता त्या ठिकाणी माझी व पोलीस चव्हाण् यांची भेट झाली नाही, त्यामुळे मी, पोलीस चव्हाण यांना फोन करुन भेटण्यासाठी आलो असल्याचे कळविले, त्यावेळी पोलीस चव्हाण यांनी मला, तुझ तुझ बग, मला फोन बिन करु नको आता तु असे म्हणुन भेटण्याचे टाळले. त्यानंतर श्री. शिर्के साहेब यांनी पोलीस चव्हाण यांचे वरिष्ठ अधिकारी पोलीस निरीक्षक गुंजवटे साहेब यांचेकडे पडताळणी करण्याचे ठरविले त्यावेळी मी, श्री. शिर्के साहेब यांना, माझ्याकडे पोलीस चव्हाण यांनी पोलीस निरीक्षक गुंजवटे साहेब यांचे नाव सांगुन लाच मागणी केली आहे, प्रत्यक्षात गुंजवटे साहेबांनी माझ्याकडे कधीही पैशाची मागाणी केलेली नाही. त्यामुळे माझी गुंजवटे साहेब यांचेकडे पडताळणीसाठी जाण्याची इच्छा नसुन त्यांचे विरुध्द माझी तक्रार ही नाही. असे सांगितले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब यांनी सदर बाबत त्यांचे वरीष्ठ श्री. नाडगौडा साहेब, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांना सविस्तर कळविले.त्यानंतर श्री.शिर्के साहेब यांनी सदरची सापळा कारवाई स्थगित करुन पोलीस चव्हाण यांचा लाच मागणी बाबत निरोप आल्यानंतर पुढील सापळा करवाई करण्याचे आपण ठरविले. त्याबाबतचा सापळा पुर्व व सापळा मागे घेतलेबबातचा पंचनामा करण्यात आला. दिनांक 19/05/2021 रोजी कारवाईमध्ये पोलीस चव्हाण यंानी मला फोनवर तुझ तुझ बग, मला फोन बिन करु नको आता तु असे म्हणुन मला भेटण्याचे टाळले तसेच माझ्यावर गुन्हा दाखल झाल्याने व माझ्यामुळे पोलीस चव्हाण यांची साहेबांनी बदली केल्यामुळे पोलीस चव्हाण हे माझ्याकडुन भविष्यात मागणी केलेली लाच रक्कम स्विकारणार नाही अशी माझी खात्री झाली. त्याबाबतचा मी दिनांक 19/05/2021 रोजी जबाब दिला आहे.त्यानंतर श्री. शिर्के साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी व सापळा कारवाईचा अहवाल मा. पोलीस अधीक्षक एसीबी पुणे यांना पाठवुन मंगळवेढा पोलीस स्टेशन येथील पोलीस चव्हाण यांचेविरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत मंजुरी प्राप्त करुन घेतली.तरी दिनांक 13/5/2021 रोजीचे पडताळणी कारवाईमध्ये मंगळवेढा पोलीस स्टेशन येथील पोलीस चव्हाण यांनी माझ्याकडे माझ्या पकडलेल्या ट्रलीवर कारवाई न करता सोडण्यासाठी व वाळु वाहतुकीचा हप्ता साहेबांना देण्यासाठी दिनांक 13/05/2021 रोजी 12.20 ते 12.51 वाजण्याचे दरम्यान मंगळवेढा पोलीस स्टेशनचे इमारतीचे पाठिमागील बाजुस रस्त्यावर 30,000/- रूपयांची लाच मागणी करुन भ्रष्ट मार्गाने अर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): JOTIRAM MANIKRAO GUNJWATE(I (Inspector)) / pi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यारा नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
मि. प्र. औटे

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

PN 408
ठाणे अंमलदार
मंगळवेढा पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): JOTIRAM MANIKRAO GUNJWAT
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pi